महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: सीएमए-४०२३/प्र.क्र.१६०/२०२३/जाहिरात. दिनांक : १८ सप्टेंबर, २०२४

**-: प्रसिद्धिपत्रक :-**

**१. महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ (जाहिरात क्रमांक ४१४/२०२३) संदर्भात:-**

दिनांक २२ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या आयोगाच्या बैठकीतील निर्णयानुसार, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ ही परीक्षा पुढे ढकलण्यात आलेली आहे. सदर परीक्षेच्या अनुषंगाने व इतर विविध मुद्यांसंदर्भात निर्णय घेण्याकरिता दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजी आयोगाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले असून, बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आल्यावर परीक्षेची सुधारित तारीख जाहीर करण्यात येईल.

**२. महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ संदर्भात:-**

सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्गाकरिता (SEBC) आरक्षणासंदर्भातील अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ मधील तरतुदी विचारात घेता शासनाच्या संबंधित सर्व विभागांकडून गट-ब व गट-क सेवेतील पदांकरिता सुधारित मागणीपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने, महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ ची जाहिरात प्रसिद्ध करता आली नाही. आयोगातर्फे शासनास विविध पदांकरिता सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबतच्या विनंतीनुसार काही सेवेतील पदांचे सुधारित मागणीपत्र आयोगास प्राप्त झालेले आहेत व काही पदांचे (जसे, की पोलीस उप निरीक्षक, अन्य विभागातील लिपिक-टंकलेखक इ.) मागणीपत्रे अद्याप अप्राप्त आहेत. सुधारित मागणीपत्रांबाबत शासनाच्या संबंधित विभागांकडे पाठपुरावा सुरु असून सुधारित मागणीपत्रे प्राप्त होताच, प्रस्तुत परीक्षेची जाहिरात प्राधान्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

उपसचिव-जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण: नवी मुंबई.